22-02-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/21/2025 11:28 PM Page 1

निवडक

पिळगाव येथील शांतादुर्गा मंदिरात उद्या सग्रह-सहोम नवचंडी अनुष्ठान

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २१ : सकल ग्रामस्थांच्या कल्याणासाठी प्रतिवर्षी आयोजित करण्यात येणारे यंदाचे सग्रह – सहोम नवचंडी अनुष्ठान रविवार दि. २३ रोजी करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी ८ वाजता गणपती पूजन, पुण्याहवाचन, आचार्य ब्राह्मण वरण, स्थळशुद्धी, देवता स्थापन, नवचंडी पाठ वाचन, ग्रहहोम व कुमारीका पूजन, क्षेत्रपाल बली, पूर्णाहुती, अभिषेक, आरती, सार्वजनिक गाऱ्हाणे, आशीर्वाद व महाप्रसाद होईल. सकाळी ७.३० ते १२.३० वाजेपर्यंत सुहासिनींसाठी श्रींची सेवा म्हणून कुंकूमार्चन करण्यात येणार आहे. ज्या सुहासिनींना यात सहभागी व्हायचे असेल त्यांनी येताना गणपती पूजन साहित्य, पिंजर, फुले, फळे, अगरबत्ती, कापूर, तांब्या, पेला, पळी, ताम्हण, ताट इत्यादी साहित्य घेऊन मंदिरात यावे. संध्याकाळी ६.३० वाजता स्थानिक कलाकारांचे भजन आणि ८ वाजता युवा उद्योजक मिलिंद पिळगांवकर प्रायोजित, स्वर अक्षय कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. यात अक्षय नाईक, समृद्ध चोडणकर, गौतमी हेदे बांबोळकर यांचे गायन होणार असून त्यांना की बोर्ड वर विष्णू शिरोडकर, तबला रोहित बांदोडकर, पखवाज ढोलक हॅण्डसोनिक अवधूत च्यारी व ऑक्टोपॅड वर आश्निन जाधव संगीत साथ करणार आहेत. सर्वांनी देवीच्या दर्शनाचा, तीर्थ – प्रसाद व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री शांतादुर्गा देवस्थान सार्वजनिक उत्सव समिती पिळगाव डिचोली गोवा यांनी केले आहे.

मांद्रेत शिवप्रेमींची उद्या बाईक रॅली

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २१ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शिवप्रेमी मांद्रेतर्फे रविवार दि. २३ रोजी दुपारी ३ वाजता बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीची सुरुवात श्री देवी सातेरी देवस्थान मराठवाडा मांद्रे येथून होणार आहे. या कार्यक्रमात आर्यन अमर पार्सेकर हा बाल कलाकार छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा साकारणार आहे, जे या रॅलीचे खास आकर्षण असेल.प या आयोजनामागे छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचावेत तसेच समाजामध्ये शिवाजी महाराजांची प्रेरणा जागृत करण्याचा संकल्प आहे. यंदा सदर उपक्रमाला १० वर्षे पूर्ण होत असल्याने दशकपूर्ती वर्षानिमित्त शिवप्रेमींचा सन्मान सोहळा आयोजित केला असून युवकांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी असलेला आदर त्यांनी रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन व्यक्त करावा, असे आवाहन कार्यकारी अध्यक्ष प्रशांत लाडू पार्सेकर यांनी केले आहे. सदर रॅली मराठवाडाहून मांद्रे गावातील विविध भागांतून मार्गस्थ होणार असून मराठवाडा येथे पोहचल्यानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता होईल. तसेच, सोमवार दि. २४ रोजी संध्याकाळी ७ वाजता अखिल गोमंतक क्षत्रिय मराठा समाज पेडणे तालुका समिती आयोजित हिंदवी नाट्य महोत्सवातील श्री देवी भगवती क्रीडा आणि सांस्कृतिक मंडळ पेडणे गोवा प्रस्तुत तो मृत्यूंजय एक हा ऐतिहासिक नाट्यप्रयोग श्री सातेरी देवस्थान रंगमंच मराठवाडा येथे सादर होणार आहे, रसिक प्रेक्षकांनी मोठ्यासंख्येने उपस्थिती दर्शवावी, असे आयोजक मराठवाडा बॉईज यांच्या वतीने आवाहान करण्यात आले आहे.

डिचोली भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : ११ केव्ही सिटी फीडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने रविवार दि. २३ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत डिचोली मार्केट, डिचोली बसस्थानकाजवळील भागात आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही सिटी फीडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २३ रोजी दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत चिमुलवाडा, हिरा टॉकीज, विश्वास नगर, कारापूरकर इमारत, वैभव रेसिडेन्सी, पाजवाडा, गावकरवाडा डिचोली आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

मडगाव भागात २४ रोजी खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : ११ केव्ही फीडर फ्लायओव्हर फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने सोमवार दि. २४ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत हिंदू फार्मसी, फास्ट ट्रॅक, गोविंद पै हार्डवेअर, मुस्तफा, वनिता ज्वेलर्स, सिल्व्हर शूज, रेनबो कलेक्शन, विस्सू व्हर्जिनकर सन्स, रत्ना ट्रेडर्स आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.
त्याचप्रमाणे ११ केव्ही मडगाव फ्लायओव्हर फीडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २३ रोजी दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत जगनाथ ट्रेडर्स, नाईक ट्रेडर्स, टीचर वाईन, फ्लायओव्हर ब्रिज परिसर, एमेस्की एंटरप्रायझेस, हॉटेल संतोष भोजनालय आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

वास्को भागात २५ रोजी खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : ११ केव्ही वास्को–१ फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत फातिमा कॉलनी, दाबोली जंक्शन आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही वास्को–२ फीडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत वास्को येथील उल्टा पुल्टा संग्रहालय, उमिया क्वात्रो ए, बी, सी, डी इमारत, क्रोमा, फ्लोफी बार, केशव स्मृती हायस्कूल, ग्रीन मेडोज इमारत, ग्रीन व्हॅली आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

वेळसाव दांडो भागात २५ रोजी खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : ११ केव्ही कांसावली फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २५ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वेर्णा येथील वेळसाव दांडो, फॅब्रिकावाडो, इन्फंट जीजस भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

मार्व्हेल कॉलनीत आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : ११ केव्ही ला–मार्व्हेल डीटीसी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. २२ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत ला–मार्व्हेल कॉलनी आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

घाणेकर, भानुशाली डीटीसी फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : घाणेकर, भानुशाली डीटीसी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शनिवार दि. २२ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सहकार भंडार, डांगी इमारत आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

कांदोळी उपकेंद्रावर आजपासून खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : कांदोळी उपकेंद्रावर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २२ फेब्रुवारी ते १ मार्च रोजी पर्यंत सकाळी ७ ते दुपारी ३ वाजेपर्यंत शिमेर, अण्णावाडो, कामुतिवाडो, आराडी, पिंटोवाडो, सौझावाडो, दांडो, सिंकेरी, मुड्डा, बामणवाडो, कॉन्फ्रारियावाडो, ओर्डा, सायपे, एफबीआर सिंकेरी, पिळर्ण इंडस्ट्रियल इस्टेट, सायन्स अँड टेक्नॉलॉजी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

बनावट परदेशी नोकर भरती एजन्सींवर कारवाई कधी?

नोकरी मिळविण्याच्या नावाखाली लाखो रुपये उकळले : गोव्यातील दोन तरुणांची फसवणूक

बासुरी देसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : अमेरिकेत कायदेशीररित्या नोकरी मिळविण्याच्या नावाखाली लाखो रुपये उकळून गोव्यातील दोन तरुणांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे गोव्यात योग्य नोंदणीशिवाय कार्यरत असलेल्या बनावट परदेशी भरती एजन्सींचे जाळे समोर आले आहे.

पीडित तरुणांनी आपली व्यथा कथन करताना सांगितले की, एजंटांनी त्यांना कायदेशीर सल्लागार असल्याचे भासवले आणि स्थानिक पोलिसांचे संरक्षण असल्याचे भ्रामक चित्र निर्माण केले. एका प्रकरणात, वर्णा येथील साहिल वर्णेकर या युवकाने परदेशातील नोकरीसाठी १४ लाख रुपये भरल्यानंतर त्याला पणजी पोलिस ठाण्यात सामंजस्य करार (एमओयू) करण्यास भाग पाडण्यात आले.

पोलिसांच्या उपस्थितीत दबावाखाली मला एमओयूवर स्वाक्षरी करावी लागली, ज्यामुळे माझ्या भरलेल्या १४ लाखांपैकी फक्त १० लाख रुपये मला परत मिळाले. उर्वरित ४ लाख रुपये आणि माझा पासपोर्ट अजूनही एजंटकडेच आहे, असे वर्णेकर यांनी हेराल्डशी बोलताना सांगितले. त्यांनी खुलासा केला की, गेल्या तीन वर्षांपासून त्यांचा पासपोर्ट पणजीतील एका प्रसिद्ध एजंटकडे होता. एजंट आता मला पुन्हा एक एमओयू स्वाक्षरी करण्यास सांगत आहे, पण तसे केल्यास मी माझे शिल्लक पैसे गमावेल, असे त्यांनी सांगितले.वेर्णेकर यांचे वडील संदीप यांनी सांगितले की, एजंटच्या एका कर्मचाऱ्याने पणजीतील महिला पोलिस ठाण्यात त्यांच्याविरोधात खोटी तक्रार दाखल करून त्यांच्या कुटुंबाला धमकावण्याचा प्रयत्न केला.

या घटनेत आणखी एक पीडित मयूर देविदास याला अमेरिकेत पाठवण्याच्या नावाखाली फसवण्यात आले. त्याला वास्कोतील कुख्यात एजंट स्टॅनली जॉर्ज याने बनावट कागदपत्रे पुरवली होती. मात्र, मेक्सिको विमानतळावर पकडल्यानंतर अमेरिकन अधिकाऱ्यांनी त्याला हद्दपार केले. मी वास्को पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास गेलो होतो, पण पोलिसांनी मदत करण्यास नकार दिला, अशी माहिती देविदास यांनी दिली. दरम्यान, एजंट स्टॅनली जॉर्ज सध्या फरार आहे. या प्रकारामुळे पोलिसांवरील विश्वास कमी होत असल्याचे देविदास यांनी सांगितले. आम्ही परदेशात नोकरीसाठी पैसे भरले, गुन्हा करण्यासाठी नाही. पोलिस जर मदत करत नसतील, तर आम्ही न्याय कुठे मागायचा? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

या प्रकरणाशी संबंधित एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, स्थानिक पोलिसांच्या सहभागाची शक्यता नाकारता येत नाही. काही एजंट स्थानिक पोलिसांच्या मदतीने काम करत असल्याचे वृत्त आहे. हे घोटाळे कोट्यवधींचे असून, यामध्ये पोलीस ठाण्यांचा गैरवापर होत असल्याचा संशय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.माजी पोलिस अधीक्षक बोसेत सिल्वा यांनी सांगितले की, भारतात कायदेशीररित्या परदेशी भरतीसाठी एजन्सींना स्थलांतरितांच्या संरक्षक जनरलची मान्यता असणे आवश्यक आहे. त्यांनी नमूद केले की, गोव्याचे स्थलांतरित नियमन प्रादेशिक कार्यालय बंगळुरू येथे आहे आणि त्यासोबत योग्य समन्वय आवश्यक आहे.

गोवा पोलिस महासंचालक (डीजीपी) आलोक कुमार यांनी दोन्ही प्रकरणांची सखोल चौकशी केली जाईल, असे आश्वासन दिले आहे. आम्ही या प्रकरणांची योग्य चौकशी करू आणि आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. वास्को पोलिस ठाण्यात तक्रारीच्या बाबतीत त्यांनी नमूद केले की, अद्याप लेखी तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. तुम्ही हे प्रकरण आमच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे आम्ही त्यावर पुन्हा लक्ष देऊ, असे डीजीपी यांनी स्पष्ट केले.पणजी पोलिस ठाण्यात झालेल्या एमओयू प्रकरणावर बोलताना त्यांनी म्हटले, पोलीस ठाणे अशा प्रकारच्या तडजोडींसाठी नाही. जर कोणाकडे ठोस पुरावे असतील, तर त्यांनी औपचारिक तक्रार नोंदवावी आणि आम्ही त्यावर निश्चितच कारवाई करू.

या घटनांमुळे गोव्यात परदेशी भरतीसाठी फसवणूक करणाऱ्या एजन्सींवर कडक कारवाईची गरज अधोरेखित झाली आहे. तसेच, पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची मागणी होत आहे.

मोठ्या निवासी इमारतींसाठी एसटीपी अनिवार्य

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २१ : साखळी नगरपरिषद हद्दीतील अनेक इमारतींमधून सांडपाणी थेट उघड्यावर सोडले जात असल्याने वाढते प्रदूषण आणि दुर्गंधी यावर नियंत्रण मिळवण्यासाठी नगरपरिषदेने मोठा निर्णय घेतला आहे. भविष्यात उभारल्या जाणाऱ्या मोठ्या निवासी इमारतींसाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बंधनकारक करण्याचा ठराव गुरुवारी पारित करण्यात आला. नगरपरिषदेच्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. एसएमसी अध्यक्षा सिद्धी प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीला उपाध्यक्ष आनंद काणेकर, नगरसेवक यशवंत मडकर, दयानंद बोर्येकर, ब्रह्मानंद देसाई, रियाज खान, प्रवीण ब्लेगन, रश्मी देसाई, दीपा जनमी, अंजना कामत, मुख्याधिकारी भीमनाथ खोर्जुवेकर तसेच नगरपालिका अभियंता आणि इतर सदस्य उपस्थित होते.

नगराध्यक्ष सिद्धी प्रभू यांनी सांगितले की, सांडपाण्यामुळे वाढणाऱ्या प्रदूषण आणि दुर्गंधीबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे नगरपरिषदेने याची गंभीर दखल घेतली असून, भविष्यात उघड्यावर सांडपाणी सोडणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. गरज भासल्यास अशा इमारतींचे वीज आणि पाणी कनेक्शन तोडण्याची कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी नगराध्यक्ष प्रभू यांनी माहिती दिली की, नगरपरिषदेने बायोमिथेनेशन प्लांट उभारण्याचा निर्णय घेतला आहे. महानगरपालिकेतून निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचा वापर वीज निर्मितीसाठी केला जाईल. या प्रकल्पासाठी सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, असे त्यांनी सांगितले.

साखळी नगरपरिषद हद्दीतील विक्रेत्यांकडून सध्या नगरपालिका निरीक्षकांकडून सोपो शुल्क वसूल केला जातो. मात्र, लवकरच ही प्रक्रिया लिलाव पद्धतीने राबवण्यात येईल, असे प्रभू यांनी स्पष्ट केले. आम्ही सोपो शुल्क कंत्राटी पद्धतीने गोळा करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे महसुलात वाढ होईल आणि पारदर्शकता राहील, असे त्यांनी सांगितले. कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेकडून विद्यमान कामगार कायम ठेवत अतिरिक्त कर्मचारी कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. नगराध्यक्ष प्रभू यांनी स्पष्ट केले की, नगरपरिषद हद्दीत कोणतेही बेकायदेशीर बांधकाम आढळल्यास त्यावर कठोर कारवाई केली जाईल. जर कोणी बेकायदेशीर बांधकाम करत असेल, तर नागरिकांनी नगरपरिषदेकडे तक्रार करावी. आम्ही अशा प्रकरणांची गंभीर दखल घेऊ, असे त्यांनी सांगितले.

माजोर्डा आणि उतोर्डा समुद्रकिनाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात मेलेले बांगडे आणि तारले मासे साचले आहेत.

रिटेल मेगा मार्केटची अत्यंत दूरवस्था

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २१ : देखभालीअभावी एसजीपीडीए रिटेल मेगा मार्केटची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे, त्यामुळे खरेदीदारांनी त्यांच्या स्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे वृद्ध खरेदीदार आणि कार्यकर्ते महेश नायक यांनी इशारा दिला की, ग्राहकांना बाजारातून डेंग्यूसह कीटकजन्य आजारांसह घरी परतण्याचा धोका आहे.

मासे विक्रेत्यांनीही बाजाराच्या बिघडलेल्या स्थितीवर टीका केली. ज्याचे नूतनीकरण अर्ध्या दशकापूर्वी दुबई मासेमारी बाजाराच्या शैलीत करण्यात आले होते.बाजाराच्या प्रवेशद्वारावर साचलेले आणि घाणेरडे पाणी असल्याने, खरेदीदारांनी सरकार आणि एसजीपीडीए प्राधिकरणावर गोव्यातील सर्वात मोठ्या किरकोळ मासेमारी बाजाराची देखभाल आणि देखभाल करण्यात अपयशी ठरल्याबद्दल संताप व्यक्त केला.

महेश नायक यांनी गेल्या दोन वर्षांत एसजीपीडीएचे अध्यक्ष किंवा वास्कोचे आमदार कृष्णा दाजी साळकर किंवा सदस्यांनीही परिस्थिती सोडवण्यात रस दाखवला नाही याबद्दल खेद व्यक्त केला. पीडीए आणि मासे विक्रेत्यांमध्ये काही समस्या असल्यास खरेदीदार आणि नागरिकांना त्रास का सहन करावा लागतो? एसजीपीडीए किरकोळ बाजारात भेट देऊन खरेदीदारांना डेंग्यू आणि इतर कीटकजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याचा धोका आहे, असे ते म्हणाले.

पीडीए मासळी बाजाराच्या देखभालीमध्ये कोणतीही एजन्सी सहभागी आहे का, असा प्रश्न दुसऱ्या एका खरेदीदाराला पडला. काही ठिकाणी पाणी साचल्याने जमिनीवर नेहमीच घाण असल्याने खरेदीदारांना त्यांची पँट वर करावी लागते, असे ते म्हणाले.

बिघडत्या परिस्थितीमुळे मासळी खरेदीदार बाजारपेठेपासून दूर राहिले आहेत, असे निदर्शनास आणून देऊन मासळी विक्रेत्यांनी त्यांच्या नशिबाला शरण गेल्याचे दिसून आले. आम्हाला मासळी विकून उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे. एकीकडे, शेकडो बेकायदेशीर मासळी विक्रेते जवळच्या घाऊक मासळी बाजारात मासे विकत आहेत. आणि इथे किरकोळ मासळी बाजारात, बाजाराच्या परिस्थितीमुळे खरेदीदार मासळी खरेदी करण्यासाठी येत नाहीत, असे एका महिला मासळी विक्रेत्याने सांगितले.

ऑनलाइन फसवणुकीचा पर्दाफाश; ५ जणांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : गोव्यात पर्यटकांना फसवण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा गैरवापर करणाऱ्या तीन प्रमुख टोळ्यांचा पर्दाफाश करण्यात आला आहे. उत्तर गोवा पोलिसांनी वेगवेगळ्या कारवायांमध्ये वॉटर स्पोर्ट्स, हॉटेल बुकिंग आणि सेक्स टॉय विक्रीच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या व्यक्तींना अटक केली आहे.

पहिल्या प्रकरणात, दिल्लीतील तीन व्यक्तींनी गोव्यात वॉटर स्पोर्ट्ससाठी बनावट तिकिटे विकण्याचा घोटाळा केल्याचे उघड झाले. १९३० सायबर क्राईम पोर्टल आणि ईमेलद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये असे आढळले की, फसवणूक करणाऱ्यांनी पर्यटकांकडून पैसे घेतले पण नंतर दिलेल्या सेवा अस्तित्वातच नव्हत्या किंवा जाहिरात केलेल्या सुविधांपेक्षा अत्यंत निकृष्ट दर्जाच्या होत्या. तपासानंतर पणजी आणि पोरवोरिम पोलिस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यात आला आणि मयंक जैन, हरीश जैन आणि शशांक वर्मा या दिल्लीतील रहिवाशांना अटक करण्यात आली.

दुसऱ्या प्रकरणात, कर्नाटकातील एका व्यक्तीने फेसबुक ग्रुपद्वारे होमस्टे बुकिंगच्या नावाखाली फसवणूक केल्याचे समोर आले. तक्रारदाराने दिलीप कुमार विश्वकर्मा यांना आगाऊ पैसे भरले, परंतु त्यानंतर आरोपीने सर्व संपर्क तोडला. कळंगुट पोलिसांनी एफआयआर नोंदवून तपास केला असता देशभरातून आरोपीविरुद्ध अनेक तक्रारी असल्याचे आढळले. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीला कर्नाटकातील बिदर येथे शोधून काढून अटक केली.

तिसऱ्या प्रकरणात, एका बंगाली व्यक्तीने ऑनलाइन सेक्स टॉय विक्रीच्या नावाखाली फसवणूक केली. तक्रारदाराने सांगितले की, संबंधित ई-कॉमर्स वेबसाइटने गोव्यातील स्थानिक उपस्थिती असल्याचा खोटा दावा केला. पैसे मिळाल्यानंतरही उत्पादन वितरित करण्यात आले नाही. पणजी पोलिसांनी एफआयआर नोंदवून तपास केला असता देशभरातून याच पद्धतीने अनेकांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी जलद कारवाई करत आरोपी शुभेंधू कुमार दास याला कोलकाता, पश्चिम बंगाल येथे अटक केली.

उत्तर गोवा पोलिस ऑनलाइन फसवणुकीविरोधात कठोर कारवाई करत असून, पर्यटकांना लक्ष्य करणाऱ्या या टोळ्यांविरोधात सक्रिय तपास सुरू आहे. या प्रकरणाच्या चौकशीत मयंक दुबे, अरुण बालगोत्रा, पीआय राहुल परब, पीआय परेश नाईक, पीआय विजय चोडणकर, पीआय महेश नाईक, पीआय महादेव आणि पीआय हरीश वायंगणकर यांचा समावेश होता.

जानेवारी महिन्यात उत्तर गोवा पोलिसांनी ऑनलाइन हॉटेल बुकिंगच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या मोठ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश केला होता. त्यानंतर पोलिसांनी अशा प्रकारच्या फसवणुकीविरोधात विशेष पथक तयार केले असून, ऑनलाइन फसवणुकीला आळा घालण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.

कर्मचारी निवड आयोगाची कागदपत्र पडताळणी सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : विविध विभागांमध्ये कनिष्ठ विभाग लिपिक आणि पुनर्प्राप्ती क्लर्क पदासाठी संगणक आधारित चाचणी झाल्यानंतर जवळपास एक महिना उलटून गेला आहे. गोवा कर्मचारी निवड आयोगाने चाचणी उत्तीर्ण झालेल्या सुमारे २३० उमेदवारांच्या कागदपत्रांची पूर्व पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

आयोगाने जारी केलेल्या सूचनेनुसार, कनिष्ठ विभाग लिपिक आणि पुनर्प्राप्ती क्लर्क पदाच्या भरती नियमानुसार आवश्यक पात्रतेच्या संदर्भात काही उमेदवारांची कागदपत्रे तपासली जातील. यामध्ये अनुभव प्रमाणपत्र, गुणवंत खेळाडू प्रमाणपत्र, वैद्यकीय प्रमाणपत्रे यांचा समावेश आहे.पूर्व पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे सादर न करणाऱ्या उमेदवारांचा सीबीसी साठी पात्रता यादीत समावेश केला जाणार नाही, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

सुमारे ७७ उमेदवारांना त्यांच्या अनुभव प्रमाणपत्राची पूर्तता करण्यासाठी सूचना देण्यात आली आहे. माजी सैनिकांच्या कुटुंबियांच्या बाबतीत ८४ उमेदवारांनी २४ फेब्रुवारीपर्यंत रिलीज, निवृत्त किंवा डिस्चार्ज प्रमाणपत्र तसेच पीपीओ सादर करणे आवश्यक आहे. सेरेब्रल पाल्सी, कुष्ठरोगमुक्त, बौनेपणा, ॲसिड हल्ल्याचे बळी आणि स्नायूंच्या डिस्ट्रॉफीसह लोकोमोटर्स अपंगत्व असलेल्या ५२ उमेदवारांनी २५ फेब्रुवारीपर्यंत सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा कायम अपंगत्व प्रमाणपत्र ईमेलद्वारे पाठवावे असे कळवण्यात आले आहे, २० उमेदवारांना त्यांच्या गुणवंत खेळाडू प्रमाणपत्रासह अनुभव प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

आयोगाने जानेवारी महिन्यात सीबीटी १ आणि सीबीटी २ चाचण्या आयोजित केल्या होत्या. पूर्व पडताळणी प्रक्रियेनंतर, पात्र उमेदवारांची अंतिम यादी तयार केली जाईल आणि त्यानुसार सीबीटी ३ ची योजना आखली जाईल. उमेदवारांनी दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रे सादर करून त्यांच्या पात्रतेची खात्री करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. आयोगाच्या अधिकृत वेबसाइटवर यासंदर्भात अधिक माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

THE AKSHAYA PATRA FOUNDATION,

Seeking dedicated professionals to join Akshaya Patra at the Multipurpose Cyclone Shelter (MPCS), Pilerne Village, Goa.
We are currently hiring for multiple positions:

Maintenance Executive (1 Position): Skilled individual with knowledge in electrical, plumbing, and general maintenance. Experience with RO, ETP, HVAC systems preferred.

Quality Executive (1 Position): A skilled individual with knowledge in food safety, experience in the food industry preferred, (Graduates/ Postgraduates - Microbiology/ Food science & Nutrition/ Food technologist Only)

Cooks (2 Positions): Experienced cooks who can prepare a variety of dishes, including local cuisine, with a focus on food safety and hygiene.

Drivers (3 Positions): Seeking male candidates with a valid driver's license, at least 2 years of experience, and excellent communication skills. **Helpers (13 Positions):** Energetic candidates needed for kitchen assistance and driving support. Prior experience is a plus.

Visit our office at:
The Akshaya Patra Foundation,
Multipurpose Cyclone Shelter (MPCS), Pilerne Village, Panchayat, Saligao, Bardwz Tauka, Goa-403511 Contact Us: Phone: +91-**9071210222** or Send your resume to:
shashi.k@akshayapatra.org